ग्रंथमालिका ‘बालसंस्कार’ : खंड २

# स्वभावदोष घालवा आणि आनंदी व्हा !

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**

**साहाय्यक**

**श्री. राजेंद्र महादेव पावसकर**

(भूतपूर्व शिक्षक, माध्यमिक विद्यामंदिर, सांताक्रूझ [पू.], मुंबई.)



**सनातन संस्था**


**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४४, इंग्रजी २०१, कन्नड १९८, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**एप्रिल २०२४ पर्यंत ३६५ ग्रंथांच्या १३ भाषांत ९६ लाख ५४ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १५.५.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०५८ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्‌घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

---

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

---

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका


卐 **पालकांना संदेश** ७

卐 **ग्रंथाचे मनोगत** ८

卐 **पालकांनो, मुलांची नावे आध्यात्मिक अर्थ असलेली ठेवा !** १०

**प्रकरण १. मन आणि स्वभाव म्हणजे काय ?** १२

१ अ. मुलांनो, मनाचे कार्य जाणून घ्या ! १२

१ आ. 'स्वभाव' कसा ठरवला जातो ? १२

**प्रकरण २. स्वभावदोष का घालवायचे ?** १३

२ अ. स्वभावातील गुण-दोषांचा काय परिणाम होतो ? १३

२ आ. स्वभावदोषांमुळे मुलांची होणारी सर्वसाधारण हानी १३

२ इ. स्वभावदोषांमुळे होणाऱ्या चुका आणि त्यांचे दुष्परिणाम १७

**प्रकरण ३. स्वभावदोष कसे घालवायचे ?** २२

३ अ. स्वभावदोष-निर्मूलन प्रक्रिया २२

३ आ. 'स्वभावदोष-निर्मूलन प्रक्रिया' कशी राबवावी ? २४

**प्रकरण ४. स्वभावदोष घालवण्याची गती कशी वाढवावी ? ६०**

४ अ. स्वभावदोष घालवण्यासाठी करावयाचे अन्य प्रयत्न ६०

४ आ. स्वभावदोष-निर्मूलन प्रक्रियेचा आढावा कसा द्यावा ? ६६

**प्रकरण ५. स्वभावदोष-निर्मूलन प्रक्रियेमुळे लाभ झाल्याची उदाहरणे ६९**

५ अ. स्वभावदोष-निर्मूलन प्रक्रियेमुळे सनातनच्या बालसाधकांमध्ये झालेले पालट ६९

**卐 पालकांनो, प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ७१**

**卐 मुलांनो, ‘आदर्श बालक’ बनण्यासाठी आजच कृती करा ! ७२**

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ७३**

**हा ग्रंथ ‘इ-बुक’ स्वरूपात उपलब्ध ! : Sanatanshop.com/ebooks**

**परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !**

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले तरी, त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे.

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## पालकांनो, 'संस्कार' ग्रंथमालिकारूपी भेट स्वीकारा । मुलाविषयीच्या तुमच्या सर्व चिंतांना दूर सारा ॥



कुंभार 'मातीच्या गोळ्या'ला जसा आकार देतो, तशा आकाराचे मडके बनते. आकार चांगला दिला, तरच मडके चांगले बनते. एकदा का मडके बनले की, नंतर त्याचा आकार पालटता येत नाही. माता-पित्यांनो, तुमच्या 'पोटच्या गोळ्या'च्या संदर्भातही हे अगदी असेच घडते. मुलावर मोठेपणी चांगले संस्कार करणे कठीण असते; परंतु कोवळ्या वयात त्याचे मन संस्कारक्षम असल्याने त्याच्यावर चांगले संस्कार करणे सोपे जाते.

स्वतःची नोकरी-व्यवसाय, दिवसभराची धावपळ आदींमधून वेळ काढून आणि चित्रपट, व्हिडिओ गेम्स यांसारख्या आकर्षणांपासून मुलाला दूर ठेवून त्याच्यावर चांगले संस्कार कसे करायचे, असा प्रश्न पालकांना पडतो. या प्रश्नाचे उत्तर म्हणजे सनातनची मुलांसाठीची 'संस्कार' ग्रंथमालिका ! पालकांनो, ही ग्रंथमालिका म्हणजे, तुमच्या मुलाचे भावी जीवन सुसंस्कारित, आदर्श आणि आनंदी बनवणारा बहुमोल ठेवा आहे.

पालक हेच मुलाचे खरे मार्गदर्शक बनू शकतात. मुलाच्या मनाची मशागत करून त्याच्यात सुसंस्कारांचे बीज पेरण्याचे कार्य निसर्गानेच पालकांवर सोपवले आहे. 'संस्कार' मालिकेतील प्रत्येक ग्रंथातील एकेक सूत्र (मुद्दा) म्हणजे सुसंस्कारांचे बीज आहे. यासाठी पालकांनो, ही ग्रंथमालिका मुलाला वाचावयास द्या. ग्रंथांतील सूत्रांवर मुलाशी चर्चा करा. अधूनमधून त्याला एकेका ग्रंथाचे पुन्हा वाचन करायला सांगा. ग्रंथात सांगितलेल्या कृती त्याच्याकडून प्रत्यक्ष करवून घ्या. मुले अनुकरणप्रिय असतात; म्हणून तुमचेही आचार-विचार नेहमी आदर्शच ठेवा, ही कळकळीची विनंती ! – **संकलक**

# मनोगत



बरीच मुले त्यांच्या मनाप्रमाणे घडले नाही किंवा आई-वडिलांनी त्यांचे ऐकले नाही, तर चिडतात, रुसतात किंवा निराश होतात. अशा मुलांना स्वतःला आणि त्यांच्यामुळे इतरांनाही त्रास होतो. राग येणे, उद्धटपणे बोलणे, खोटेपणा आदी दोष हे वाईट स्वभावाचे, तर प्रेमळपणा, इतरांना साहाय्य करणे, संयम आदी गुण हे चांगल्या स्वभावाचे निर्देशक आहेत. गुणी बालक सर्वांनाच आवडतो ना ! जो आवडतो सर्वांना, तोची आवडे देवाला ! स्वतःतील दोष घालवणे, ही समाधानी अन् आनंदी बनण्याची सोपी युक्ती आहे !

या ग्रंथात आळशीपणा, उद्धटपणा, अव्यवस्थितपणा इत्यादी स्वभावदोषांमुळे मुलांची कशी हानी होते; त्यांच्या हातून कोणत्या चुका होतात; हे दोष घालवण्यासाठी मुलांनी 'स्वयंसूचना' कशा द्याव्यात; चुकीसाठी कोणते प्रायश्चित्त घ्यावे आदींचे उदाहरणांसहित विवेचन केले आहे.

सध्याच्या स्पर्धात्मक युगात यशस्वी भवितव्य (करीयर) घडवण्यासाठी बौद्धिक क्षमतेसह मुलांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास झालेला असणेही आवश्यक आहे. न्यूनगंड, भीती, काळजी, नैराश्य यांसारख्या स्वभावदोषांमुळे मन दुर्बल होते. स्वार्थीपणा, मत्सर, चिडचिडेपणा यांसारख्या दोषांमुळे सर्व सोयीसुविधा उपलब्ध असतांनाही सुखी-समाधानी होता येत नाही. जीवनात सतत आनंदी रहाता येण्याकरता आपल्यातील स्वभावदोष दूर करण्यासाठी सातत्याने आणि तळमळीने प्रयत्न करणे आवश्यक असते. स्वभावदोष जाऊन मुलांमधे आंतरिक सुधारणा झाली की, 'खऱ्या अर्थाने त्यांच्या

व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला', असे म्हणता येईल.

हा ग्रंथ अभ्यासल्याने मुलांचे दोष जाऊन अन् गुण वाढून त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होवो, तसेच त्यांचे भावी जीवन आनंदी आणि यशस्वी बनो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

## पालकांना नम्र विनंती !

'स्वभावदोष-निर्मूलन प्रक्रिया' ही एक मानसिक उपचारपद्धत आहे. या विषयाची मुलांना सवय नसते. बहुतांशी मुलांना एखादी गोष्ट चिकाटीने करण्याचीही सवय नसते. तसेच 'दोष-निर्मूलन प्रक्रिया' राबवतांना मनाशी सतत संघर्ष करावा लागत असल्याने मुलांना ही प्रक्रिया आरंभी कठीणही वाटते. वस्तूतः ही प्रक्रिया कठीण नाही, तर आनंददायी आहे. पालकांनो, तुमचा आधार, तुमचे साहाय्य मुलांमध्ये या प्रक्रियेविषयी आत्मविश्वास निर्माण करण्यात लाखमोलाचे ठरेल, यात शंका नाही.


**मुलांना स्वदेश अन् स्वधर्म यांविषयीची कर्तव्ये सांगणारा सनातनचा ग्रंथ !**

**राष्ट्र आणि धर्म प्रेमी व्हा !**

- स्वभाषाभिमानी होण्यासाठी काय करावे ?
- स्वदेशी वस्तू वापरण्याचे महत्त्व काय आहे ?
- राष्ट्राच्या प्रतिकांचा सन्मान कसा राखावा ?
- धर्मप्रेम वाढण्यासाठी कोणत्या कृती कराव्यात ?

